सुराज्य सोलापूर



## आयटी पार्कसाठी पडले एक पाऊल पुढे

# २० हेक्टर जमीन औद्योगिक महामंडळाला हस्तांतरितचे आदेश

### पालकमंत्री जयकुमार गोरे यांची माहिती

✔ सोलापूर/प्रतिनिधी

सोलापूरच्या आयटी पार्कसाठी होटगी येथील गट नंबर ५७६ मधील २० हेक्टर (५० एकर) जमीन औद्योगिक महामंडळाला हस्तांतरित करण्याचे आदेश विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांनी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांना दिल्याची माहिती पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी दिली. यावेळी आमदार देवेंद्र कोठे यांची प्रमुख उपस्थिती होती.

पालकमंत्री जयकुमार गोरे म्हणाले, सोलापुरात आयटी पार्क सुरू करण्यासाठी आमदार देवेंद्र कोठे तसेच इतर लोकप्रतिनिधी सातत्याने पाठपुरावा करत आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोलापूरला आयटी पार्क करणार असल्याचा शब्द सोलापूरकरांना दिला होता. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोलापूरकरांना दिलेला शब्द पूर्ण होण्याकडे या निर्णयामुळे एक पाऊल पुढे पडले आहे. या निर्णयामुळे आमदार देवेंद्र कोठे यांच्या पाठपुराव्याला यश आले आहे.

विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांच्या आदेशानुसार २० हेक्टर (५० एकर) जमीन औद्योगिक विकास महामंडळाकडे हस्तांतरित करण्यात येणार आहे. त्यानंतर आयटी पार्कच्या उभारणीला वेग येणार आहे. सोलापूरच्या जनतेने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना मतदानरुपी आशीर्वाद दिले आहेत. त्यामुळे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिलेल्या शब्दानुसार आयटी पार्कच्या उभारणीला आता वेग येणार आहे.

सोलापूरच्या वस्त्रोद्योग व्यवसायाला इचलकरंजीच्या धर्तीवर सवलती देण्यासाठी आगामी अधिवेशनात बैठक लावण्यात येणार आहे. सोलापूरची विमानसेवा, समांतर जलवाहिनी ही कामे पूर्ण झाली आहेत. तसेच आगामी काळात अंतर्गत पाणीपुरवठ्यासाठीची कामेही लवकरच सुरू होणार आहेत, असेही पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी याप्रसंगी सांगितले.



“विकसित सोलापूरची पायाभरणी,सोलापुरात आगामी काळात तयार होणारे आयटी पार्क म्हणजे विकसित सोलापूरची पायाभरणी असणार आहे. होटगी येथील २० हेक्टर (५० एकर) जागा औद्योगिक महामंडळाला हस्तांतरित करण्याचे आदेश म्हणजे त्याचीच दमदार सुरुवात आहे. सोलापूरला आयटी पार्क सुरू होण्यासाठी मंजुरी देणारे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि त्यासाठी निरंतर प्रयत्न करणारे पालकमंत्री जयकुमार गोरे यांचे सोलापूरांतर्फे आभार.

**- देवेंद्र कोठे,** आमदार, शहर मध्य



सोलापूर : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा सत्कार करताना पालकमंत्री गोरे.

# सोलापुरातील हुरडा भेटीतून नवे राजकीय संकेत

## शहाजी पवारांना संधी मिळणार? ; मार्डीतील त्या फोटोंची रंगली चर्चा

✔ सोलापूर/प्रतिनिधी

राज्यातील नगरपंचायत, महानगरपालिका, जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांत भारतीय जनता पक्षाने मोठे यश मिळवत सत्तेची पकड अधिक मजबूत केली. विशेषतः सोलापुरात महापालिका आणि जिल्हा परिषदेवर भाजपची सत्ता प्रस्थापित झाली. या सत्तास्थापनेमागे जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांचे नेतृत्व महत्त्वाचे मानले जात आहे. आता लवकरच विधान परिषद निवडणूक होत आहे. यात प्रामुख्याने राजेंद्र राऊत, प्रशांत परिचारक यांच्याबरोबर आता उत्तर तालुक्यातील भाजपा नेते शहाजी पवार यांचे नाव पुढे येत आहे.

नुकत्याच झालेल्या जिल्हा परिषद निवडणुकांत त्यांना देण्यात आलेली जबाबदारी त्यांनी प्रामाणिकपणे पार पाडल्याचे बोलले जात आहे. विशेषतः शहर मध्य मतदारसंघातील विधानसभा निवडणुकीत त्यांनी निभावलेली भूमिका निर्णायक ठरल्याची चर्चा आहे जिल्हा परिषद निवडणुकीत उत्तर सोलापूर तालुक्यातील तिन्ही जागा भाजपकडे खेचून आणण्यात शहाजी पवार यांचा वाटा महत्त्वाचा आहे. स्थानिक पातळीवर संघटन बळकट करण्याचे काम त्यांनी सातत्याने केले आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांमधून निवडून येणाऱ्या विधान परिषदेच्या जागेसाठी सध्या चर्चा सुरू आहे. यामध्ये माजी आमदार प्रशांत परिचारक, राजन पाटील, राजेंद्र राऊत आणि दिलीप माने यांच्या नावांची चर्चा रंगली आहे. याचसोबत शहाजी पवार यांचेही नाव पुढे येत असून, इतर सर्वांच्या नावापुढे आमदारकी आहे; आता पक्षाने शहाजी भाऊंचा विचार करावा, अशी भावना कार्यकर्त्यांमध्ये व्यक्त होत आहे.



सोलापूर : मार्डी येथे चर्चा करताना ना.गोरे, आ.कल्याणशेट्टी, शहाजी पवार.

### ‘त्या’ फोटोची चर्चा रंगली

शुक्रवारी मार्डी येथील पवार यांच्या शेतात पालकमंत्री जयकुमार गोरे, आमदार सचिन कल्याणशेट्टी, देवेंद्र कोठे, महापौर विनायक कोंड्याल, शहराध्यक्ष रोहिणी तडवळकर आणि सभागृह नेते नरेंद्र काळे यांनी एकत्र येत हुरड्याचा आस्वाद घेतला. या भेटीचे फोटो सोशल मीडियावर व्हायरल झाले असून, येणाऱ्या विधान परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर त्यातून राजकीय संकेत मिळत असल्याची चर्चा आहे. ते फोटो’ बरेच काही सांगून जात आहेत; पुढील राजकीय समीकरणे काय रंग घेणार, हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.

### ना. गोरे- कल्याणशेट्टींची भूमिका महत्वाची

सध्या सोलापूर शहर आणि जिल्ह्यात पालकमंत्री जयकुमार गोरे यांचा प्रभाव वाढलेला दिसतो. त्यांच्यासोबत आमदार सचिन कल्याणशेट्टी यांचीही ताकद असल्याने विधान परिषदेसाठी दिलेला उमेदवार निश्चितच विजयी होईल, अशी राजकीय वर्तुळात चर्चा आहे. आता पक्षश्रेष्ठी कोणावर विश्वास ठेवतात आणि शांतपणे काम करणाऱ्या शहाजी भाऊंना संधी मिळते का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

### चंद्रकांत दादांच्या शब्दाचे काय?

नुकतेच उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील बार्शीमध्ये आले होते. त्यांनी बार्शीचे माजी आमदार राजेंद्र राऊत यांना शहर आणि तालुक्यात त्यांनी केलेल्या कष्टाचे फळ येत्या एप्रिल महिन्यात निश्चितच मिळेल, असे सांगितले होते. बार्शीच्या भगवंताला मी देखील साकडे घातले असून भगवंतापेक्षा कोणीच मोठे नाही त्यामुळे बार्शीसाठी एप्रिल महिन्यात गोड बातमी मिळणार आहे, असेही मंत्री पाटील म्हणाले होते. त्यामुळे आता राऊत की पवार की अन्य अशी चर्चा सुरू झाली आहे.

# आता ‘डीपीसी’वर जाण्यासाठी सदस्यांचे लॉबिंग

## एप्रिलमध्ये ४० सदस्यांची निवड होणार

✔ सोलापूर : जिल्हा नियोजन समितीसाठी (डीपीसी) नगरपालिका, महापालिका तसेच जिल्हा परिषदेतून ४० सदस्यांची निवड एप्रिल महिन्यात करण्यात येणार आहे. आता येथे जाण्यासाठी सदस्यांची लॉबिंग सुरू झाली आहे. या निवडीतही पालकमंत्री जयकुमार गोरे यांची भूमिका महत्वाची ठरणार आहे.

राज्य शासनाकडून आदेश प्राप्त होताच जिल्हा प्रशासनाकडून निवडणूक अधिकारी नियुक्त केला जाणार आहे. संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांमधील निवडून आलेले सदस्य मतदानाद्वारे या ४० सदस्यांची निवड करतील. स्थानिक स्वराज्य संस्थांतील ४० जागांसाठी निवडणूक होणार आहे.

महापालिकेतील स्वीकृत सदस्य, स्थायी समिती व परिवहन समितीच्या निवड प्रक्रिया सुरू आहेत. त्याचबरोबर जिल्हा परिषद व पंचायत समित्यांमधील पदाधिकाऱ्यांच्या निवडीही लवकरच पार पडणार आहेत. या सर्व प्रक्रियेनंतर पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या नेतृत्वाखाली डीपीसी सदस्यांची निवड होणार आहे. नियोजित समितीमध्ये १४ विशेष निमंत्रित सदस्य असणार आहेत. एकूण ६४ सदस्य राहतील. विकासकामांना मंजुरी देणे व बैठकीत सूचना मांडणे हे अधिकार सदस्यांना राहतील. नामनिर्देशित सदस्य, खासदार, आमदार, वैज्ञानिक विकास महामंडळाचा प्रतिनिधी, पालकमंत्री, जिल्हाधिकारी आदींचा समावेश यात असणार आहे. डीपीसीत स्थान मिळवण्यासाठी इच्छुक नगरसेवकांनी आतापासूनच प्रयत्न सुरू केले आहेत.




सोलापूर : अवंती नगरमधील रस्त्यांचे खा. प्रणिती शिंदे यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. शहराध्यक्ष चेतन नरोटे व इतर.

# जि. प. निवडणुकीतील अपयशाची जबाबदारी माझीच

## आ.अभिजीत पाटील यांचे आत्मचिंतन

✔ माढा : जिल्हा परिषद निवडणुकीत आलेल्या अपयशाची मी जबाबदारी स्विकारली आहे. या निवडणुकीत उमेदवारी देताना अनेक चुका झाल्या. आघाडीच्या चर्चा फिस्कटल्या. चुका सुधारुन निकालाचे आत्मचिंतन करुन पुन्हा कामाला लागल्याचे आमदार अभिजित पाटील यांनी सांगितले.

विधानसभा निवडणुकीच्या तुलनेत माढ्याच्या ७८ गावात ४ हजार ६०० मते मला कमी पडले असल्याचे आमदार पाटील यांनी मान्य करत जनाधार घटला तरी त्याचे खापर इतरांवर न फोडता त्यांनी स्वताच्या चुका सुधारुन नव्याने कामाला लागत असल्याचे आ. पाटील यांनी जाहीरपणे सांगितले. मतविभागणीचा फटका कसा बसला यावरही त्यांनी भाष्य केले. यावेळी आनंदराव कानडे, दिनेश जगदाळे, भैय्या खरात, आबा साठे, जितू जमदाडे आदी उपस्थित होते.



### व्हीसीआर कंपनीवर बंदी आणा

व्हीसीआर विमान कंपनीवर तातडीने बंदी आणली पाहीजे, कंपनीवर आणि विमान मालकावर सदोष मनुष्य वधाचा गुन्हा दाखल करुन मालकाला अटक करावी अशी मागणी केली आहे.

# स्वीकृतसह स्थायी सदस्य निवडीत देशमुखांना दे धक्का

## भाजप आणि संघ परिवाराला प्राधान्य

✔ सोलापूर : महानगरपालिकेतील स्वीकृत सदस्य आणि स्थायी समितीच्या निवडी शुक्रवारी पार पडल्या. यामध्ये आ. विजय देशमुख आणि आ. सुभाष देशमुख समर्थकांना चांगला धक्का बसल्याचे दिसून येत आहे. स्वीकृत नगरसेवकांची यादीवर नजर टाकली असता भाजपचे पदाधिकारी, निष्ठावंतांसह आ. देवेंद्र कोठेंच्या समर्थकांना संधी दिल्याचे दिसून येते. तर स्थायी समितीमध्ये जरी उत्तर मतदारसंघातील सदस्यांची नावे असले तरी त्यातही कोठे समर्थकच जास्त आहेत.

महापालिकेत शुक्रवारी महापालिकेच्या सर्वसाधारण सभेत स्वीकृतच्या नियुक्त्या झाल्या. या निवडी केवळ संघटनात्मक नसून, आगामी स्थानिक राजकारणाच्या पार्श्वभूमीवर महत्त्वपूर्ण मानल्या जात आहेत. स्वीकृत नगरसेवकांमध्ये आ. सुभाष देशमुख व आ. विजयकुमार देशमुख यांचा एकही समर्थक नसल्याचे दिसून येत आहे.

रोहिणी तडवळकर या माजी नगरसेविका असून, सध्या त्या भाजपच्या शहराध्यक्ष म्हणून काम पाहत आहेत. त्यांची निवड थेट पक्षाकडूनच झाली आहे. अक्षय अंजीखाने हे मंडल अध्यक्ष असून, आमदार देवेंद्र कोठे यांचे समर्थक आहेत. ज्ञानेश्वर म्याकल हे भाजपचे जुने निष्ठावंत कार्यकर्ते असून, त्यांच्या नावे संघाकडून आले आहे. रुद्रेश बोरामणी हे भाजपचे माजी शहर सरचिटणीस आहेत. भाजप संघटनेकडून त्यांच्या नावाची शिफारस झाली आहे. ऋषिकेश म्हेट्रे हे आ. देवेंद्र कोठे यांचे शहर मध्य मतदारसंघातील समर्थक आहेत.मनीष केत यांची निवड पालकमंत्री व आ. देवेंद्र कोठे यांच्या शिफारशीनुसार झाली आहे. ते राज्य मराठी पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष आहेत. श्रीनिवास दायमा हे जुने भाजपचे निष्ठावंत कार्यकर्ते आहेत. त्यांची निवड पालकमंत्री आणि आमदार देवेंद्र कोठे यांच्या शिफारसीनुसार झाली आहे. वृषाली चालुक्य या भारतीय जनता पार्टी युवा मोर्चाच्या माजी शहराध्यक्ष आहेत. त्यांचे नाव मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडूनच आल्याचे बोलले जात आहे.

### स्थायी सभापती निवडीतही डावलणार

स्वीकृत सदस्य निवडीतून दोन्ही देशमुखांना डावल्यानंतर आता स्थायी सभापती निवडीतही दोघांना धक्का बसणार असल्याचे राजकीय वर्तुळात बोलले जात आहे. सभापतीपदासाठी अविनाश पाटील या ज्येष्ठ नगरसेवकाची चर्चा असली तरी पालकमंत्री समर्थक रंजित चाकोते यांची सभापतीपदी वर्णी लागेल असे बोलले जात आहे.



सोलापूर : भाजपकडून निवडण्यात आलेले ८ स्वीकृत नगरसेवक विजयाची खूण करताना दिसत आहेत.

# मोहोळच्या सभापती पदाकडे सर्वांचे लक्ष

## आवताडेंसह चौधरी यांच्या नावाची चर्चा

✔ मोहोळ/प्रतिनिधी

पंचायत समितीतील १२ जागांपैकी ७ जागांवर भाजपाने निर्विवाद वर्चस्व मिळविल्यानंतर आता सभापती पदाकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. तालुक्याचा कारभार हाकणाऱ्या पंचायत समितीचे सभापती पद नेमके कोणाला मिळणार? याबाबतची चर्चा सध्या तालुक्यात सुरू आहे. घोडेश्वर पंचायत समिती गणातून निवडून आलेले असलम चौधरी व कामती पंचायत समिती गणातील कोमल आवताडे यांची नावे सध्या चर्चेत आहेत.

मोहोळ जिल्हा परिषद, पंचायत समितीच्या निवडणुकीमध्ये माजी आमदार राजन पाटील व यशवंत माने यांच्या माध्यमातून भाजपाने जि. प. च्या ६ पैकी ४ जागांवर तर पं. स. च्या १२ पैकी ७ जागांवर विजय मिळवून पंचायत समितीवर भाजपचा झेंडा रोवला आहे. निवडणुकीच्या निकालानंतर मोहोळ तालुका पंचायत समितीच्या सभापती पदी कोणाची निवड होणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. सभापतीपदाचे आरक्षण ओबीसी प्रवर्गासाठी खुले आहे. यासाठी भाजपमधील कोमल आवताडे, असलम चौधरी ही नावे चर्चेत आहेत. भाजपाकडून पोखरापूर पंचायत समिती गणातून विजयी झालेल्या संजीव खिलारे यांना गटनेते पदाची संधी देण्यात आली आहे. सभापतीपदातील दोन्ही नावांपैकी कोणाच्या नावावर शिक्कामोर्तब होणार का याकडे तालुक्याचे लक्ष लागले आहे.



कोमल आवताडे



असलम चौधरी

### असे आहे पक्षीय बलाबल

पंचायत समितीच्या १२ जागांमध्ये भाजपच्या पारड्यात ७ सदस्य, अजित दादा राष्ट्रवादीला ३ सदस्य, शिंदे सेनेला १ तर शरद पवार राष्ट्रवादीला १ सदस्य असा मतदारांनी कौल दिला आहे.भाजपचे सात सदस्य असल्याने भाजपचा सभापती होणार यात शंका नाही. या दोन सदस्यांपैकी भाजपच्या माध्यमातून माजी आमदार राजन पाटील व माजी आमदार यशवंत माने कोणाच्या गळ्यात सभापतीपदाची माळ घालणार? याकडे तालुक्यातील जनतेचे लक्ष लागले आहे.